| | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

**प्रेस नोट** दिनांक :२०/१०/२०२४

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दि. १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

सदर कारवाईत दिनांक १९ व २० ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत अवैध गावठी हातभट्टीची दारू बनविणारी ठिकाणे, त्यामध्ये डोंगर, द-या, नदी, नाले अशा अतिदुर्गम ठिकाणांवर पायपीट करून, त्यांचा शोध घेवून छापे टाकण्यात आले आहे. तसेच अवैधरित्या गावठी दारू, देशी विदेशी मद्याची वाहतूक करणारे वाहने, तसेच विक्रीच्या ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे. तसेच अवैधरित्या गुटख्याची विक्री व वाहतुक करणा-या आणि अवैधरित्या मटका व जुगार चालविणारे व खेळणारे इसमांवर देखील कारवाई करण्यात आली आहे.

यामध्ये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ४२ इसमांविरूध्द कारवाई करण्यात आली असून ४२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे, त्यात देशी विदेशी मद्य व हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन व साहित्य सामुग्री असा एकुण १३,६९,९०५/- रूपये किंमतीचा मुद्देमाल नाश / जप्त करण्यात आला आहे. अवैधरित्या गुटख्याची विक्री व वाहतुक करणा-या इसमांविरूध्द ०५ गुन्हे दाखल करण्यात आले असुन २३,३०८/- रू. किं.चा अवैध गुटखा जप्त करण्यात आला आहे. तसेच विनापरवाना बेकायदेशीररित्या अंक आकडयांवर पैसे लावुन मटका व जुगार खेळणारे व खेळविणारे इसमांविरूध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) प्रमाणे कारवाई करून ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे त्यात १०,२४०/- रूपये रोख व जुगाराचे साहित्य साधने जप्त करण्यात आली आहे.

सदर कारवाई मध्ये एम.आय.डी.सी. सिन्नर पोलीस ठाणे हद्दीत जिंदाल फाटा परिसरात एका मारूती इको व्हॅनमध्ये अवैधरित्या देशी व विदेशी मद्याची वाहतुक होत असल्याबाबत पोलीस पथकास माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे जिंदाल फाटा, सिन्नर एम.आय.डी.सी. परिसरात सदर वाहनावर छापा टाकून कारवाई केली असता, त्यामध्ये ५५,९६५/- रूपये किंमतीचा देशी व विदेशी मद्याचा अवैध साठा व मारूती इको व्हॅन असा एकुण ४,०५,९६५/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर छाप्यात इसम नामे सागर बाबासाहेब दाभाडे, रा. भंडारवाडी, संगमनेर नाका, सिन्नर, ता.सिन्नर, जि.नाशिक यास ताब्यात घेण्यात आले असून त्याचेविरूध्द एम.आय.डी.सी. सिन्नर पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.